# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१५/प्र.क्र. १३ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.

विषय :- राजकीय पक्षाने पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीबाबत द्यावयाचे सूचना पत्र.

संदर्भ :-१) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११, दि. २५/२/२०१३

२) राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र.९/का.५ दि. २१/१/२०१७

महोदय / महोदया,

राज्य निवडणूक आयोगाने संदर्भांकीत दि. २५/२/२०१३ व दि.२१/१/२०१७ च्या आदेशान्वये महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाच्या सूचना पत्राचा नमुना (जोडपत्र-१) विहित केलेला आहे. महानगरपालिकेच्या निवडणुकांकरिता सदरच्या विहित नमुन्यातील सूचनापत्र महानगरपालिका आयुक्त तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांना सादर करावयाचे आहे. तथापि, राजकीय पक्षांना वेळेअभावी सर्व निवडणूक अधिकारी यांच्याकडे विहित नमुन्यातील जोडपत्र-१ पोहचविणे शक्य होत नसल्याने असे सूचनापत्र महानगरपालिका आयुक्त यांचेकडे विहित वेळेत सादर केले तरी पुरेसे होईल किंवा कसे अशी राज्य निवडणूक आयोगाकडे विचारणा करण्यात येत आहे.

२. यासंदर्भात स्पष्ट करण्यात येते की, राजकीय पक्षांनी विहित नमुन्यातील जोडपत्र-१ विहित मुदतीत महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर केल्यास, सदर जोडपत्राच्या प्रमाणित प्रती सर्व संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे उचित कार्यवाहीसाठी तात्काळ पाठविण्यात याव्यात.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(नि. ज. वागळे)
अवर सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\MAHALE\Wagale\मनपा-जोडपत्र १.docx/महाले